ePaper

# काँग्रेस 50 जागाही जिंकणे कठीण; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची टीका




॥ वर्ष - 7 । अंक - 321 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- कोलकाता नाईट रायडरप्ले ऑफसमध्ये
- शिल्पाचं सडेतोड उत्तर
- ७५ वर्षांचे झाल्यानंतर मोदी निवृत्त ?
- माझ्या कुटुंबावर हल्ला करण्याचा डाव



www.mahaenews.com | रविवार, दिनांक 12 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## प्रचाराच्या तोफा थंडावल्या

# अंतिम टप्प्यात `महायुती' ची मुसंडी

### » लोकसभा रणसंग्राम : मोहोळ, आढळराव यांची प्रचारात बाजी

**। पुणे । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

**लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचे मतदान उद्या सोमवारी (दि. १३ मे) रोजी होत असून शनिवारी सायंकाळी प्रचाराच्या तोफा थंडावल्या. शेवटच्या टप्प्यात महायुतीच्या उमेदवारांनी चांगलीच मुसंडी मारली असून पुणे मतदारसंघातील मुरलीधर मोहोळ आणि शिरुरमधील शिवाजीराव आढळराव पाटील यांचा महाविजय टप्प्यात आल्याचे स्पष्ट दिसत आहे. दरम्यान मावळमधून शिवसेनेचे श्रीरंग बारणे आणि शिवसेनेचे (उबाठा गट) संजोग वाघेरे यांच्या कांटे की टक्कर होणार असे वातावरण आहे.**



महाविजय टप्प्यात



चुरस शिगेला

> पुण्याची चारही बाजूंनी होत असलेली अवाढव्य वाढ आणि बेसुमार लोकसंख्या यामुळे पुणे बकाल होणार नाही ना याची दखल येथील लोकप्रतिनिधींनी घ्यावी. पुण्याचा पाण्याचा प्रश्न, वाहतूक कोंडीचा प्रश्न यासाठी खासदार, आमदार, नगरसेवकांनी एकत्र बैठक घेऊन पुढील काळात पुण्याचा आराखडा निश्चित करावा.
>
> **- राज ठाकरे,** मनसे अध्यक्ष

लोकसभा निवडणुकीसाठी होत असलेल्या चौथ्या टप्प्यातील मतदान उद्या (सोमवारी) होत असून या प्रचाराच्या अंतिम टप्प्यात सर्वच ठिकाणी चुरस शिगेला पोहोचली आहे. प्रचाराच्या तोफा थंडावल्या असल्या तरी हाती असलेल्या शेवटच्या दिवशी घरोघरी प्रचारावर कार्यकर्ते भर देतील.

या शेवटच्या टप्प्यात पुण्यात झालेली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची सभा प्रचंड गाजली. त्यांच्या सभेला पावसाच्या पार्श्वभूमीवर झालेली अफाट गर्दी बरेच काही सांगून गेली. त्यांनी पुण्यातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्यापुढे पुण्याच्या विकासाचा रोड मॅप सादर केला आणि समोर जमलेल्या लाखोंच्या गर्दीला `महायुती'ला मतदान करण्याचे आवाहन केले. याच सभेचे पडसाद शिरुर मतदारसंघावरही चांगलेच उमटले. पुण्यातील हडपसर, कोंढवा आणि कात्रजचा काही भाग शिरुर मतदारसंघात येत असल्यामुळे राज ठाकरे यांचे हे आवाहन तेथील महायुतीच्या मतदारांनाही चांगलेच भावले असणार. या शेवटच्या टप्प्यातच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार, शरद पवार, आदित्य ठाकरे, रोहित पवार, यांच्या सभाही चांगल्याच गाजल्या.

सर्वच राजकीय पक्षांच्या प्रत्येक विधानसभा मतदारसंघात झालेल्या पदयात्रांनाही मिळणारा प्रतिसाद पाहता महायुतीसाठी वातावरण अनुकूल आहे असे मत अनेक राजकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान मावळ मतदारसंघात शिवसेनेचे श्रीरंग बारणे आणि उबाठा गटाचे संजोग वाघेरे यांच्यातील चुरस मात्र शिगेला पोहोचली आहे.

## `राज'गर्जना महायुतीसाठी गेमचेंजर

### » शरद पवार यांच्यावर थेट आरोप : हिंदू मतदारांसाठी काढला फतवा

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यातील जाहीर सभेत जातीयवादाचे बीज पेरण्याचे कारस्थान करणाऱ्या शरद पवार यांच्यावर जोरदार टीका केली. त्यांच्याच पठडीत तयार झालेल्या अजितदादा पवार यांच्याबाबत मात्र त्यांनी स्पष्ट सांगितले की, अजितदादांनी कधीच जातीयवादाचा आधार घेतलेला नाही. मुस्लिमांसाठी फतवा काढणाऱ्यांचा तीव्र निषेध त्यांनी केला आहे.**

राज ठाकरे यांची पुण्यातील सभा ही महायुतीच्या उमेदवारांसाठी गेमचेंजर ठरावी अशीच झाली. इतके दिवस मुस्लिमांसाठी फतवा काढून कॉंग्रेसला मते देण्याचे आवाहन करणारे मौलवी पाहिले होते. पण थेट हिंदुंसाठी मतदान करावे, असे राज ठाकरे यांनी आवाहन केले आणि टाळ्यांचा कडकडात झाला. `माझ्या तमाम हिंदू मातांनो, बंधूंनो आणि भगिनींनो' असे म्हणतच त्यांनी थेट मौलवींचे वाभाडे



काढले. भारतीय जनता पक्षाचे किंवा महायुतीमधील अन्य पक्षांचे नेते असे कधी धाडस करताना पाहिले नाही. राज ठाकरे यांच्या या `राज' गर्जनेमुळे मतदार मात्र खुश झाले आणि महायुतीला भरभरून मतदान करण्याचा निर्धार करूनच घरी परतले.

### मुस्लिम म्हणजे गुरे-ढोरे आहेत का? : राज ठाकरे

» कॉंग्रेसला मतदान करा, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मतदान करा, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला मतदान करा असे फतवे मशिदीमधून मौलवी काढत असतील तर मीदेखील फतवा काढतो असे म्हणत राज ठाकरे यांनी तमाम हिंदू मतदारांना भावनिक आवाहन केले. मुरलीधर मोहोळ, भाजपाचे इतर उमेदवार, एकनाथ शिंदे यांचे उमादवार तसेच अजित पवारांचे उमेदवार यांना भरघोस मतांनी निवडून द्या. महाराष्ट्रामध्ये वातावरण अतिशय गढूळ बनले असून त्याला कारणीभूत कोण याचा शोध घ्या. मुस्लिम समाज म्हणजे तुमच्या घरची गुरे-ढोरे आहेत का ? आपला कोण आहे ? आणि आपला वापर कोण करत आहे हे त्यांना व्यवस्थित कळते.

# गेल्या दहा वर्षात मोदींनी पुण्याचं चित्र बदललं!

## पुण्यात मोहोळांसाठी देवेंद्र फडणवीसांची सांगता सभा

। घोडेगाव । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ही देशाची निवडणुक असून गल्लीचा नाही तर दिल्लीचा नेता निवडण्याची निवडणूक आहे. आता या निवडणुकीमध्ये दोन बाजू तयार झाल्या आहेत. महाभारताच्या युद्धामध्ये एक पांडवांची बाजू होती तर एक बाजू कौरवांची बाजी होती. पांडवांकडे अनेक सेना, राजे होते. तर कौरवांकडे देखील अनेक राजे, सेना होती.**



तशाच प्रकारची अवस्था आज आपल्या देशात आहे. एका बाजूला विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी आहे. नरेंद्र मोदी यांच्यासोबत अजित पवारांची राष्ट्रवादी, शिंदेंची शिवसेना, राज ठाकरेंची मनसे, आठवले साहेबांची रिपाई तर दुसऱ्या बाजूला राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली २४ पक्षांची खिचडी आहे.आपल्याला विचारलं की आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं नाव पंतप्रधान पदासाठी सांगतो, परंतु दुसऱ्या बाजूला एक रोज टिव्हीवर येणारा पोपट बोलतो की, पाच वर्ष आम्ही पाच पंतप्रधान देऊ. परंतु आपल्याला १४० कोटी जनतेचा नेता निवडायचा आहे. परंतु दुसऱ्या बाजूला मोठा खेळखंडोबा सुरूय. त्यांच्याकडे नेता नाही, नियत नाही आणि नितीपण नाही. अशी टिका देखील देवेंद्र फडणवीस यांनी केली. पुढे बोलतांना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कोविडच्या काळात अनेक मोठे नेते घरी बसले होते. परंतु मुरलीधर मोहोळ महापौर असतांना त्यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून लोकांची सेवा केली आहे. गेल्या दहा वर्षात नरेंद्र मोदी यांनी पुण्याचं चित्र बदललं आहे. पुण्यामध्ये मेट्रो आली. 20000 आपण घर बांधली. चोविस तास पाण्याची योजना आणली. रस्त्यांच्या संदर्भात ट्रॅफिकच्या अडचण सोडवली. सर्व सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन होईल. आता अशा प्रकारे नवीन पुणे हे मोदीजींच्या नेतृत्वास तयार होत आहे.

### मोदींनी केला चमत्कार

नरेंद्र मोदी यांनी देशामध्ये एक चमत्कार केला. गेल्या दहा वर्षात गरिबी रेषेतून लोकांना बाहेर काढलं. हा जगातला एक रेकॉर्ड आहे. ज्याने वीस कोटी गरिबांना कच्च्या घरातनं झोपडीत न स्वतःच्या पक्या घरात आणलं. ज्यांनी 50 कोटी गरिबांच्या घरी गॅस सिलेंडर दिला. त्यांनी 55 कोटी गरिबांना शौचालय दिला. त्यांनी 60 कोटी गरिबांच्या घरी ७० वर्षानंतर पिण्याच्या पाण्याचा नळ पोचवला. ज्याने ८० कोटी गरिबांना 2020 सालापासून त्या ठिकाणी मोफत दोन रेशन दिला. आपल्या महाराष्ट्रातही सात कोटी लोकांना मोफत रेशन देण्याचं काम हे मोदीजींच्या माध्यमातून झालं. जवळजवळ 64 कोटी लोकांना दहा लाखापर्यंतचा लोड मुद्रा योजनेच्या अंतर्गत मोदीजींनी दिला. दहा लाखाचं लोन देताना बिना तारण आणि बिना गॅरेंटर्स दिला. असेही ते म्हणाले.

---

# वाघेरे पाटील यांच्या पदयात्रेला तुफान प्रतिसाद

## व्यापारी, व्यावसायिकांसह मतदारांशी साधला संवाद

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी पिंपरी परिसरात पदयात्रा काढून प्रचार केला. या पदयात्रेत "संजोग वाघेरे पाटील आगे बडो, हम तुमारे साथ है"..."एकच ध्यास, "मावळ लोकसभेचा विकास", अशा घोषणा देत असंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पदयात्रेत मतदरांना संजोग वाघेरे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.**



संजोग वाघेरे यांच्या पदयात्रेस पिंपरीगावातून प्रारंभ झाला. पुढे पिंपरी बाजारपेठेत गुरुद्वारा, साई चौक, शगुन चौक, अशोक चौक, रिव्हर रोड, डीलक्स चौकासह परिसरातील व्यापारी व मतदार बंधू-भगिनींना अभिवादन करत संजोग वाघेरे पाटील यांनी मशाल चिन्हासमोरील बटण दाबून विजयी करण्याचे आवाहन केले. ठिकठिकाणी त्यांचे फटाक्यांची आतषबाजी, फुलांचा वर्षाव करत स्वागत करण्यात आले. त्यांच्यासमवेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार ॲड गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, उपजिल्हाप्रमुख रोमी संधू, मावळ लोकसभेचे प्रचारप्रमुख योगेश बाबर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी व्यापारी, व्यावसायिकांनी संजोग वाघेरे पाटील यांचे आपुलकीने ठिकठिकाणी स्वागत केले. पदयात्रेत "संजोग वाघेरे पाटील आगे बडो, हम तुमारे साथ है"..."एकच ध्यास, "मावळ लोकसभेचा विकास", "येऊन येऊन येणार कोण ?, संजोग वाघेरेंशिवाय दुसरं आहेच कोण ?' अशा घोषणांनी पिंपरीतील परिसर कार्यकर्त्यांनी दणाणून सोडला. या भागात पदयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### फटाक्यांची आतषबाजी, फुलांचा वर्षाव

व्यापारी वर्गासोबत संवाद साधताना संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, गेल्या दहा वर्षात केंद्रातील सरकारमुळे सर्वसामान्य वर्ग बेजार झालेला आहे. परंतु, नोटबंदी, जीएसटी आणि जाचक कायद्यामुळे व्यापारी, व्यावसायिक वर्गाला मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागलेला आहे. तर दुसरीकडे मावळ लोकसभेतील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. मतदारसंघात पिंपरीसह अनेक ठिकाणी लहान-मोठ्या बाजारपेठा आहेत. व्यापारी वर्गाला उद्भ्‍भणा-या अडचणी आणि त्यांचे प्रश्न मांडण्याकडे आताच्या खासदारांनी दुर्लक्ष केले. व्यापारी वर्गाचे प्रश्न मांडून त्याला वाचा फोडण्याचे काम करू, असे आश्वासन या निमित्ताने वाघेरे यांनी व्यापारी वर्गाला दिले. तसेच, येत्या 13 तारखेला मशाल चिन्ह लक्षात ठेवून उद्धव ठाकरे साहेबांची स्वाभीमानी शिवसेना आणि महाविकास आघाडीला विजयी करा, अशी साद त्यांनी घातली.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा महा रोड शो अन शक्तिप्रदर्शन!

## पिंपरी-चिंचवड शहरात श्रीरंग बारणे यांच्या प्रचाराची सांगता..!

। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारार्थ शनिवारी पिंपरी-चिंचवड शहरात झालेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'महा रोड शो'ला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. त्यानिमित्त जोरदार शक्तीप्रदर्शन करत बारणे यांच्या प्रचाराची मोठ्या धुमधडाक्यात सांगताही झाली.**



मुख्यमंत्र्यांच्या 'महा रोड शो'मध्ये खासदार बारणे, आमदार अण्णा बनसोडे, अश्विनी जगताप, उमा खापरे, महेंद्र थोरवे, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप तसेच अपर्णा डोके, अश्विनी चिंचवडे, राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, चंद्रकांता सोनकांबळे, मयूर कलाटे, सचिन चिखले, निलेश बारणे, महेश बारणे, सीमा सावळे, तुषार हिंगे, मोरेश्वर शेडगे, संदीप वाघेरे, सुनील पाथरमल, बाळासाहेब वाल्हेकर, प्रकाश मलशेट्टी, निलेश तरस, राजेंद्र तरस, कुणाल वाव्हळकर, आशा शेंडगे, डब्बू आसवानी, संतोष बारणे, माया बारणे आदी पदाधिकारी, माजी नगरसेवक व हजारो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

ढोल-ताशांचा दणदणाट आणि फटाक्यांचा कडकडाटात क्रेनच्या सहाय्याने फुलांचे भले मोठे हार घालत, फुलांच्या पाकळ्यांची उधळण करत, भगव्या कागदांच्या तुकड्यांचा पाऊस पाडत चौका-चौकात मुख्यमंत्री शिंदे व खासदार बारणे यांचे जंगी स्वागत करण्यात येत होते. भगवे झेंडे, भगव्या टोप्या, भगवे फेटे घातलेले तरुण दुचाकीस्वार तसेच शेकडो मोटारी सहभागी झाल्याने महा रोड शोचा संपूर्ण मार्ग 'भगवा' झाला होता.

भगवे फेटे व भगव्या साड्या परिधान केलेल्या महिलांची उपस्थिती ही लक्षणीय होती. कडाक्याचे ऊन असतानाही रस्त्याच्या दुतर्फा कार्यकर्ते व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मुख्यमंत्री शिंदे व खासदार यांनी हात उंचावून अभिवादन केले की एकच जल्लोष होत होता.

बारणे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे स्वतः उपस्थित राहिले होते. त्यावेळी मिरवणुकीत देखील ते सहभागी झाले होते. त्यानंतर ते प्रचाराच्या सांगतेसाठी पुन्हा आवर्जून मावळ मतदारसंघात आल्यामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण दिसून येत होते. चिंचवड येथील चापेकर चौकातून दुपारी सव्वाबारा वाजता क्रांतिवीर चापेकर बंधूंच्या शिल्पसमूहास अभिवादन करून मुख्यमंत्र्यांच्या महा रोड शोचा प्रारंभ झाला. चिंचवड गावातील पॉवर हाऊस चौक, लिंक रोड, तानाजी गावडे चौक, भाटनगर, इंदिरा गांधी उड्डाणपूल, शगुन चौक, साई चौक, गुरुद्वारा, जयहिंद स्कूल चौक, काळेवाडी नदी पूल, काळेवाडी रोड, पंचनाथ चौक, एम एम स्कूल, बीआरटी रोड, तापकीर चौक, रहाटणी चौक, काळेवाडी फाटा, बेलठीकानगर 16 नंबर, संतोष मंगल कार्यालय, गुजर नगर, वाकड रोड चौक या मार्गे डांगे चौक, असा महा रोड शोचा मार्ग होता. डांगे चौकातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ ठीक पावणेतीन वाजता या महा रोड शोची सांगता झाली.

### मोदी व बारणे यांची हॅटट्रिक निश्चित – मुख्यमंत्री

नरेंद्र मोदी यांची पंतप्रधानपदाची तर श्रीरंग बारणे यांची खासदारकीची हॅटट्रिक निश्चित आहे, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'रोड शो'ची सांगता करताना व्यक्त केला. 42 अंश तापमान असतानाही हजारो लोक हसतमुखाने रोड शोमध्ये सहभागी झाले होते. आमचे स्वागत करत होते. रस्त्याच्या दुतर्फा माणसांची गर्दी होती. इथले मतदार आनंदी व खूश दिसले. सर्वांच्या चेहऱ्यावर एवढा आनंद मी पहिल्यांदाच पाहिला. गेली दहा वर्षे पंतप्रधान मोदी यांनी केलेले काम व गेल्या दोन वर्षातील महायुती सरकारचे काम याची पोचपावती 13 मेला मतदानातून द्यायची आहे आणि चार तारखेला विरोधकांचे बारा वाजवायचे आहेत, असे शिंदे म्हणाले.

---

# 'रेड झोनमुक्त पिंपरी-चिंचवड'साठी पाठपुरावा करणार!

## देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन; आमदार महेश लांडगे यांच्या आग्रही मागणीला प्रतिसाद

। पिंपरी ।प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील 'रेड झोन'चा प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. अनेकदा बैठक झाली. तत्कालीन संरक्षण मंत्री मनोहर पर्रिकर यांनीही सकारात्मक भूमिका घेतली होती. पण, हा प्रश्न सोडवण्यासाठी पुन्हा प्रयत्न करणे गरजेचे आहे. देशात नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील आणि शिरुरमधून शिवाजीराव आढळराव पाटील हे खासदार होतील. त्यामुळे 'रेड झोनमुक्त पिंपरी-चिंचवड' करण्यासाठी आम्ही पुन्हा संरक्षण विभाग आणि प्रधानमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार आहोत आणि हा प्रश्न सोडवणार आहोत, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**



शिरुर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारानिमित्त भोसरी येथील गावजत्रा मैदानावर जाहीर सभा आयोजित करण्यात आली. यावेळी फडणवीस बोलत होते.

आमदार महेश लांडगे यांनी आपल्या भाषणात 'रेड झोन' बाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे लक्ष वेधले. फडणवीस यांच्या सहकार्यामुळे शहरातील शास्तीकर, उपयोगकर्ता शुल्क, कचरा प्रक्रिया प्रकल्प, स्वतंत्र पोलीस आयुक्तालय, समाविष्ट गावांचा विकास, आंद्रा, भामा आसखेड पाणी प्रकल्प आदी 'भोसरी व्हीजन-२०२०'मधील सर्व महत्वपूर्ण विषय मार्गी लागले. हा प्रश्न तुम्हीच सोडवू शकता त्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांची 'रेड झोन'ची मुक्तता करावी, असे आवाहन आमदार लांडगे यांनी केले. दरम्यान, २०१४ मध्ये राज्यात भाजपा प्रणित सरकार स्थापन झाल्यापासून भोसरीतील ऐतिहासिक गावजत्रा मैदानावर देवेंद्र फडणवीस यांनी ज्या-ज्या वेळी जाहीर सभा केल्या. आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडकरांचे प्रश्न आणि मागण्या त्यांच्यासमोर ठेवल्या. त्या सभांमध्ये दिलेल्या सर्व आश्वासनांची त्यांनी पूर्तता केलेली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा याच मैदानावर फडणवीस यांनी 'रेडझोन'बाबत पिंपरी-चिंचवडकरांना आश्वासित केले आहे. त्यामुळे रेडझोनमधील मिळकतधारक, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिक अशा २ लाख पिंपरी-चिंचवडकरांच्या आशा आता पल्लवीत झाल्या आहेत.

> "पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे २ लाख मिळकतधारक, लघु व मध्यम उद्योजक यांना दिलासा देण्यासाठी 'रेड झोन' हद्द कमी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आमदार महेश लांडगे यांनी 'रेड झोन मुक्त पिंपरी-चिंचवड'ची मागणी केली. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले आहे. 'रेड झोन'चा तिढा सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> - शिवाजीराव आढळराव पाटील, महायुती उमेदवार.

# निवडणुकीच्या रणधुमाळीत हिंदु-मुस्लिम वाद कशासाठी?



## नसती उठाठेव

**संपूर्ण देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना अचानक एक अहवाल सादर झाला. त्यात हिंदुची लोकसंख्या किती टक्क्यांनी घटली आणि मुस्लिमांची लोकसंख्या किती टक्क्यांनी वाढली हे नमूद करण्यात आले आहे. ही नसती उठाठेव नेमकी कशासाठीं? हे कळलेच नाही.**

लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत भारतासह शेजारील देशातील हिंदू, मुस्लीम आणि इतर धर्मियांच्या लोकसंख्येतील तफावत पुढे आणणारा एक अहवाल प्रसार माध्यमांमध्ये आढळला. उल्कापात हा तसा वेगळाच विषय, परंतु आकाशातून एखादी भरकटलेली उल्का पृथ्वीवर येऊन अचानक आदळावी, तिचा आगापिछा कुणालाच ठाऊक नसावा, तिच्या येण्यामागचे कारण अर्थात अकस्मातच असावे, परंतु ती आदळल्यानंतर कुतूहलमिश्रीत जिज्ञासा कमालीची वाढीस लागावी, अशी काहीशी अवस्था या अहवालामुळे तयार झाली आहे. या अहवालात देशातील हिंदू समाजाची लोकसंख्या घटली असून मुस्लीम समाजाची संख्या वाढल्याचा निष्कर्ष नोंदवण्यात आला आहे. खरे तर या अहवालाचा विषयच तो सध्याच्या राजकीय पटलावर अचानक येऊन आदळण्यामागचे कारण विशद करतो. तरीही हा अहवाल प्रसिद्ध होण्याच्या टायमिंगवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलीच जुंपली आहे. मतदानाच्या तिसऱ्या



टप्प्यापर्यंत घसरलेल्या राजकीय नैतिकतेला धार्मिक ध्रुवीकरणाच्या दिशेने घेऊन जाणारा हा अहवाल सध्या टीकेचा धनी ठरत आहे. 'शेअर ऑफ रिलिजियस मायनॉरिटीज : अ क्रॉस-कंट्री ॲनालिसिस (१९५० - २०१५)' या नावाने पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेने हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालात १९५० ते २०१५ दरम्यान हिंदू लोकसंख्या ७.८२ टक्क्यांनी घटली. १९५० मध्ये मुस्लीम लोकसंख्या ९.८४ टक्के होती. ती २०१५ मध्ये वाढून १४.०९ टक्के झाली. ख्रिश्चन समाजाची लोकसंख्या २.२४ टक्क्यांवरून २.३६ टक्क्यांवर पोहोचली. जैन समाजाची लोकसंख्या १९५० मध्ये ०.४५ टक्के होती. ती घटून २०१५ मध्ये ०.३६ टक्क्यांवर आली. शीख समाजाची लोकसंख्या १९५० मध्ये १.२४ टक्के होती. ती २०१५ मध्ये १.८५ टक्क्यांपर्यंत वाढली. पारशी समाजाची लोकसंख्या १९५० मध्ये ०.०३ टक्के होती. २०१५ मध्ये घटून ०.००४ टक्के झाली, असे नमूद करण्यात आले आहे.

ज्या आर्थिक सल्लागार परिषदेने हा अहवाल प्रसिद्ध केला आहे, त्या परिषदेची स्थापना २०१७ मध्ये करण्यात आली होती. देशापुढील अनेक विषय हलकेच बाजूला सारून जातीवादाच्या मुद्याला हात घालण्यात आला का अशी विरोधकांमध्ये चर्चा सुरू झाली. राजस्थानच्या बांसवाडा येथील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट मुस्लीम समाजाला लक्ष्य करण्याचे धाडस केले. काँग्रेस सरकारच्या काळात देशाच्या संपत्तीवर पहिला अधिकार मुसलमानांचा आहे, असे वक्तव्य तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी केल्याचा संदर्भ देत हिंदूंची सगळी संपत्ती एकत्रित करून ती ज्यांना जास्त मुले असतात, ज्यांनी घुसखोरी केलीय अशांना वाटली जाईल. तुमच्या कष्टाचे पैसे घुसखोरांना वाटलेले तुम्हाला चालतील का? तुम्हाला हे मान्य आहे का? असे प्रश्न उपस्थित करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनसमुदायाला चिथावण्याचा प्रयत्न केला. एवढेच नाही, तर काँग्रेसच्या जाहीरनाम्यानुसार देशातील माता-भगिनींच्या सोन्याचा आढावा घेऊन ते सोने घुसखोरांमध्ये वाटले जाईल. हे 'अर्बन नक्षल' विचार माझ्या भगिनींच्या मंगळसूत्रापर्यंत पोहोचतील, असा दावाही पंतप्रधान नरेंद मोदी यांनी केला. त्यांच्या या वक्तव्याचा आणि या अहवालाचा संबंध जोडण्याकडे विरोधकांचा कल आहे. अर्थात नरेंद्र मोदी यांच्या टीमच्या हे लक्षात आले असणार!

उद्योगपती अदानींसोबतच्या मैत्रीपूर्ण संबंधांवरून संसदेत फोटो झळकूनही मोदी सरकारने ताकास तूर लागू दिली नाही आणि काल परवा काँग्रेसला या दोन्ही उद्योजकांकडून काळ्या पैशांचा पुरवठा झाल्यानेच या दोघांवरील प्रश्न थांबवल्याचा आरोप पंतप्रधानांनी केला, परंतु हे सर्व आरोप, हिंदू-मुस्लीम वादाचे विषय सत्ताधारी आता कसे हाताळणार हा एक मुद्दा आहेच. कुठल्या धर्माची लोकसंख्या किती वाढली - किती घटली, यापेक्षा बेरोजगारी, महागाई, शिक्षण हेच सर्वसामान्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे प्रश्न आहेत, हे सत्ताधारी एनडीएच्या लक्षात आहेच!

## संपादकीय »

### कुटुंबाशी बोलण्याची आता कैद्यांना सुविधा

***कारागृहात अनेक वर्षांपासून खितपत पडलेल्या कैद्यांना लवकरच त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधता येणार आहे. राज्यभरातील कैद्यांना ई-मुलाकात आणि स्मार्ट कार्ड कॉलिंग सुविधा दिल्या जाणार आहेत.***

जुलै २०२० मध्ये कोविडच्या काळात, कारागृहामध्ये कैद्यांसाठी व्हॉईस आणि व्हिडिओ कॉल सुविधा सुरू करण्यात आली. मात्र, ही सुविधा २०२१ मध्ये अचानक बंद करण्यात आली. २०१६ साली जारी केलेल्या मॉडेल प्रिझन मॅन्युअलनुसार, प्रत्येक कारागृहाच्या अधीक्षकाने कैद्यांना त्यांच्या कुटुंबातील सदस्य आणि वकिलांशी संपर्क साधण्यासाठी पैसे देऊन टेलिफोन आणि व्हिडिओ कॉल करण्याची सुविधा देण्यात आली होती. व्हॉईस आणि व्हिडीओ कॉल सुविधा बंद करण्याचा सरकारच्या निर्णयामुळे कैद्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत असल्याने तो रद्द करण्यात यावा, अशी मागणी करत पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज या स्वयंसेवी संस्थेने जनहित याचिका दाखल केली होती.

बहुतेक प्रत्येकाचा आवडता पदार्थ म्हणजे चॉकलेट. सध्या या चॉकलेटला विषाणूचे ग्रहण लागले असून तो एक जागतिक किर्तीचा प्रश्न बनला आहे. चॉकलेटचा आवश्यक घटक असतो तो म्हणजे कोको अथवा 'ककाव'. याची लागवड केली जाते त्याला विषाणूने ग्रासले आहे.

# चॉकलेट्स खाताय... जरा जपून!

"कुछ मीठा हो जाए" हे शब्द पाहिले किंवा कानावर पडले तरी आपल्याला साखर हा गोड पदार्थं आठवत नाही. तर आठवते ते चॉकलेट! ज्यांना मधुमेह नाही अशा जगातल्या अक्षरशः प्रत्येक पुरुष, महिला आणि बालकाला सर्वात आवडणारा पदार्थ असेल तर तो चॉकलेट हा आहे आणि याच चॉकलेट संदर्भातील एक बातमी आज जगात पोचवली जातेय ती अशी की चॉकलेट या पदार्थाला रोग झालाय आणि तो प्रचंड वेगाने पसरत असल्यामुळे चॉकलेटवर संक्रांत येण्याची शक्यता आहे.

चॉकलेटचा आवश्यक घटक असतो तो म्हणजे कोको अथवा 'ककाव'. याची लागवड केली जाते आणि जगभर आपले आवडते चॉकलेट पोहचते. आता या चॉकलेटच्या झाडाला 'फांदीला सूज आणणाऱ्या विषाणूचा (व्हायरस) संसर्ग झाला आहे आणि त्यातून एकूण लागवडीपैकी १५ ते ५० टक्के लागवडीवर विपरीत परिणाम झाला आहे. हा विषाणू 'मीलीबग्ज' नावाच्या छोट्या आकाराच्या कीटकाच्या माध्यमातून पसरतो आणि तो या झाडाची पाने, कळ्या आणि फुले यांचा फडशा पाडतो. विषाणूचा हा आघात सर्वाधिक प्रमाणात पश्चिम आफ्रिकेत झाला आहे आणि हाच भाग जागतिक चॉकलेट उत्पादनाचे केंद्र आहे. एकट्या घाना या देशात गेल्या काही वर्षात २५ कोटीहून अधिक 'ककाव' अथव चॉकलेटची झाडे नष्ट झाली आहेत.

"या विषाणूमुळे जागतिक चॉकलेट पुरवठ्याला मोठा धोका पोहोचला आहे" असे मत या अभ्यासाचे प्रमुख अमेरिकेतील टेक्सास विद्यापीठाचे प्राध्यापक बेनिटो चेन चार्पेन्टियर यांनी 'पीएलओएस वन' नियतकालिकातील आपल्या शोध प्रबंधात म्हटले आहे. ते म्हणतात की या कीटकांवर कीटकनाशके काम करीत नाहीत. त्यामुळे शेतकरी लोकांना संसर्ग झालेली झाडे नष्ट करून नवीन कीटकरोधक जातीची लागवड करावी लागते आहे.

चॉकलेटविना जगाचा विचार करून बघा. चॉकलेटचे मूळ असलेला कोको हा भारतात चहाचे आगमन होण्याअगोदर मुलांना रोज सकाळी देण्याचे एक दर्जेदार पेय होते. थंडीच्या दिवसात गरमागरम कोको हे त्या काळातील मोठ्या माणसाचेही आवडते पेय असायचे. विषाणूचा हा संसर्ग कुठेही न थांबता पसरतोच आहे ही काळजीची बाब आहे.

चॉकलेटचे संरक्षण करण्यासाठी आशा नाही असे नाही. शेतकरी आपल्या लागवडीला आवश्यक ती लस टोचून काही प्रमाणात लागवड वाचवू शकतात. परंतु ही लस अतिशय खर्चिक आहे आणि ती लहान शेतकरी लोकांना परवडणारी नाही. त्यामुळे इकडे आड तर तिकडे विहीर अशी त्यांची परिस्थिती आहे. प्राध्यापक बेनिटो चेन चार्पेन्टिय त्यांच्या सहकाऱ्यांनी आणखी काही आणि घानामधील कोको संशोधन संस्था मदतीने एका नव्या गणिती पद्धत विषाणूच्या पसरण्यावर उपाय शोधेल, अशी आशा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सुंदर तें ध्यान उभे विटेवरी ।  
कर कटावरी ठेवूनियां ॥१॥  
तुळसीचे हार गळां कासे पीतांबर ।  
आवडे निरंतर तें चि रूप ॥ध्रु.॥  
मकरकुंडलें तळपती श्रवणीं ।  
कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥२॥  
तुका म्हणे माझें हें चि सर्व सुख ।  
पाहीन श्रीमुख आवडीनें ॥३॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# माझ्या कुटुंबावर हल्ला करण्याचा डाव

## मनोज जरांगे पाटील यांचा खळबळजनक दावा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणासाठी आंदोलनाचे हत्यार उपसणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी नुकताच एक खळबळजनक दावा केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलत असताना ते म्हणाले की, मराठा हा कधीच जातीयवादी नव्हता. मराठा समाज जातीयवादी असता तर या महाराष्ट्रात सुशीलकुमार शिंदे, वसंतराव नाईक, मनोहर जोशी कधी मुख्यमंत्री होऊ शकले नसते. गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री होऊ शकले नसते.**



गोपीनाथ मुंडे यांची मुलगी दोनदा खासदार होऊ शकली नसती, पंकजा मुंडे आणि पुतण्या धनंजय मुंडे आमदार होऊ शकले नसते. अशी शेकडो उदाहरणे देता येतील, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, “मराठा समाज जातीयवादी असता तर देवेंद्र फडणवीसही मुख्यमंत्री होऊ शकले नसते. मराठा समाज हा भाजपाच्या विरोधात कधीच नव्हता. मराठा समाजानेच तुम्हाला राजसत्तेवर बसवले. पण त्याच राजसत्तेवरून बसून गृहखात्याचा तुम्ही गैरवापर केला. मराठ्यांच्या मुलांवर केसेस केल्या, एसआयटी नेमून त्रास दिला. माझ्या कुटुंबियांवरही हल्ले करण्याचा डाव आखण्यात आला.ही पद्धत गृहमंत्र्यांना शोभणारी नाही. मी आणि माझे कुटुंब जरी डावावर लागले असले तरी मी सरकारला ऐकणारा नाही. सरकारला माझी निष्ठा विकत घेता येणार नाही.”मी समाजासाठी प्रामाणिकपणे काम करत आहे. कोट्यवधी लोकांना आतापर्यंत आरक्षण मिळाले आहे. यापुढे मी धनगर, मुस्लीम यांच्या आरक्षणासाठी प्रयत्न करणार आहे. बारा बलुतेदारांचा वेगळा प्रवर्ग करण्याचा प्रयत्न आहे. या सगळ्या जाती एकत्र आल्या तर आपला सुपडा साफ होईल, अशी भीती काहींना वाटते. माझा प्रामाणिक विकत घेता येत नाही म्हणून माझ्या कुटुंबावर प्राणघातक हल्ला करण्याचा डाव आखला जात असल्याची माहिती मला मिळाली आहे, असा खळबळजनक दावा मनोज जरांगे पाटील यांनी एबीपी माझाशी बोलताना दिली.

### माझी निष्ठा विकत घेता येणार नाही

मराठा समाज हा भाजपाच्या विरोधात कधीच नव्हता. मराठा समाजानेच तुम्हाला राजसत्तेवर बसवले. पण त्याच राजसत्तेवरून बसून गृहखात्याचा तुम्ही गैरवापर केला. मराठ्यांच्या मुलांवर केसेस केल्या, एसआयटी नेमून त्रास दिला. माझ्या कुटुंबियांवरही हल्ले करण्याचा डाव आखण्यात आला. ही पद्धत गृहमंत्र्यांना शोभणारी नाही. मी आणि माझे कुटुंब जरी डावावर लागले असले तरी मी सरकारला ऐकणारा नाही. सरकारला माझी निष्ठा विकत घेता येणार नाही.

हा खळबळजनक दावा करत असताना मनोज जरांगे पाटील यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाराजी व्यक्त केली. “गृहमंत्र्यांचा माझ्यावर आणि माझ्या समाजावर रोष आहे. कारण मी त्यांचे ऐकत नाही. ते हुकूमशहा आहेत. त्यांना वाटतं ते म्हणतील तसंच व्हावं, नाहीतर ते तुरुंगात टाकतील. मी मागेही याबाबत बोललो होतो. माझ्याविरोधात एसआयटी स्थापन करणे, खोटे व्हिडीओ बनवणे, माझ्याविरोधात काही लोक मुंबईत नेऊन बसविणे, त्यांच्याकरवी आरोप करायला लावणे, असले प्रयोग करून झाले आहेत”, असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. आपल्या कुटुंबावर हल्ला होणार हे तुम्हाला कसं समजलं? असा प्रश्न विचारला असता जरांगे पाटील यांनी त्यावर उत्तर देणे टाळले. माझ्या माहितीचा स्त्रोत सांगू शकत नाही. पण ही माहिती देणारे गृहमंत्र्यांच्याच आजूबाजूचे आहेत, असा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला. गोपीनाथ मुंडे यांची मुलगी दोनदा खासदार होऊ शकली नसती, पंकजा मुंडे आणि पुतण्या धनंजय मुंडे आमदार होऊ शकले नसते. अशी शेकडो उदाहरणे देता येतील, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, “मराठा समाज जातीयवादी असता तर देवेंद्र फडणवीसही मुख्यमंत्री होऊ शकले नसते.

# पोलिसांनी पुरावा न दिल्याने तिघांना सोडण्यात आलं

## नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणावर पृथ्वीराज चव्हाणांची प्रतिक्रिया

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील विशेष न्यायालयाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात प्रकरणात ११ वर्षांनी आपला निकाल जाहीर केला आहे. या प्रकरणात एकूण पाच आरोप होते. त्यापैकी सचिन अंदूरे, शरद कळसकर यांना दोषी ठरवत विशेष न्यायाधीशांनी जन्मठेप सुनावली आहे.**

तसेच पाच लाखांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. तर इतर तीन आरोपी डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. या सगळ्या घटनेबाबत महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सनातन ही दहशतवादी संघटना असल्याचं आमचं आजही म्हणणं आहे असंही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले आहेत.“डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणाचा निकाल ११ वर्षांनी लागला. पोलिसांनी पुरावा सादर न केल्याने तिघांना सोडण्यात आलं. हा एक कट होता. त्यात कोण सामील होतं हे समोर आलेलं नाही. सनातन संस्थेचे लोक कटात सहभागी होते, असं म्हटलं होतं. सनातन संस्थेच्या प्रवक्त्याचं वक्तव्य ऐकलं. हा कट कुठे शिजला? मुख्य सूत्रधार कोण ते समजलेलं नाही, सगळं



दडपण्यात आलं आहे असं मला वाटतं. सनातन संस्थेच्या तारा कुठे जुळतात ते समोर आलं नाही का? ज्या प्रवृत्तींनी गांधींचा खून केला त्याच प्रवृत्तींनी दाभोलकरांचा खून केला हे मी आधीही म्हणालो होतो आणि आत्ताही म्हणतो आहे.” असं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.सनातन संस्था ही दहशतवादी संस्था आहे असं माझं मत आहे. मी मुख्यमंत्री असताना सनातन संस्थेवर देशव्यापी बंदी आणा अशी मागणी आम्ही तेव्हा गृहमंत्रालयाकडे केली होती. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या होण्याच्या दोन वर्ष आधी ही बंदी घालण्याची मागणी आम्ही केली होती. तसंच नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येनंतर पुन्हा एकदा पत्र लिहिलं होतं. सनातन संस्थेचा सहभाग नेमका कसा होता ते स्पष्ट झालेलं नाही. सनातन संस्थेवर बंदी घालावी ही मागणी अजूनही केंद्राकडे प्रलंबित आहे. दाभोलकर प्रकरणात जो निकाल देण्यात आला त्यावर मी समाधानी नाही.” असंही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

### सनातन ही दहशतवादी संघटना

या प्रकरणात एकूण पाच आरोप होते. त्यापैकी सचिन अंदूरे, शरद कळसकर यांना दोषी ठरवत विशेष न्यायाधीशांनी जन्मठेप सुनावली आहे. तसेच पाच लाखांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. तर इतर तीन आरोपी डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. या सगळ्या घटनेबाबत महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

दोन लोकांनी हे मान्य केलं आहे की, आम्ही दाभोलकरांना गोळ्या घातल्या त्यांनाच शिक्षा झाली. नंतर देखील गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी यांची हत्या झाली. त्यामुळे तपास योग्य झाला नाही. या चौकशीबाबत समाधान व्यक्त करण्याची कुठलीही गरज नाही”, अशी भूमिका पृथ्वीराज चव्हाण यांनी मांडली. टीव्ही ९ मराठीला दिलेल्या प्रतिक्रियेत त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.दोन लोकांनी हे मान्य केलं आहे की, आम्ही दाभोलकरांना गोळ्या घातल्या त्यांनाच शिक्षा झाली. नंतर देखील गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी यांची हत्या झाली. त्यामुळे तपास योग्य झाला नाही. या चौकशीबाबत समाधान व्यक्त करण्याची कुठलीही गरज नाही”, अशी भूमिका पृथ्वीराज चव्हाण यांनी मांडली. टीव्ही ९ मराठीला दिलेल्या प्रतिक्रियेत त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.

# 75 वर्षांचे झाल्यानंतर मोदी निवृत्त होणार?

## केजरीवालांच्या दाव्यावर अमित शाहांचे प्रत्युत्तर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तिहार तुरुंगातून बाहेर आल्यानंतर अरविंद केजरीवाल यांनी आज आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांना जाहीर सभेद्वारे संबोधित केले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपावर जोरदार टीका केली. "पुढील वर्षी १७ सप्टेंबर रोजी मोदी ७५ वर्षांचे होणार असून त्यांना राजकारणातून निवृत्ती घ्यावी लागेल आणि त्यांच्याजागी अमित शाह पंतप्रधान होतील", असा दावा अरविंद केजरीवाल यांनी केला होता. या दाव्यावर आता अमित शाह यांनी थेट उत्तर दिले आहे. तेलंगणाच्या दौऱ्यावर असलेल्या अमित शाह यांनी आज हैदराबाद येथे पत्रकार परिषद घेतली.**



पत्रकार परिषदेत अरविंद केजरीवाल यांच्या दाव्याबाबत प्रश्न विचारला असता ते म्हणाले, "पंतप्रधान मोदी ७५ वर्षांचे होणार असल्यामुळे केजरीवाल आणि कंपनीला फार आनंदीत होण्याची गरज नाही. ७५ व्या वर्षी निवृत्त व्हावे, हे भाजपाच्या घटनेत कुठेही लिहिलेले नाही. नरेंद्र मोदी आपली टर्म पूर्ण करतील. तसेच पुढेही मोदीच देशाचे नेतृत्व करत राहतील. याबाबत भाजपात कोणताही संभ्रम नाही. विरोधक मात्र संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत."एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना अमित शाह म्हणाले की, या देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यातील जनता पंतप्रधान मोदी यांच्यामागे आहे. इंडिया आघाडीच्या नेत्यांनाही याची कल्पना आहे की, आम्ही ४०० पार जाणार आहोत. तसेच मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार आहेत, याचीही त्यांना कल्पना आहे. त्यामुळेच अशाप्रकारचे विधान करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना अमित शाह म्हणाले की, या देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यातील जनता पंतप्रधान मोदी यांच्यामागे आहे. इंडिया आघाडीच्या नेत्यांनाही याची कल्पना आहे की, आम्ही ४०० पार जाणार आहोत. तसेच मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार आहेत, याचीही त्यांना कल्पना आहे. त्यामुळेच अशाप्रकारचे विधान करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.अमित शाह पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदी हेच २०२९ पर्यंत पंतप्रधानपदावर राहतील. तसेच २०२९ च्या निवडणुकीचे नेतृत्वही त्यांच्याकडेच असेल. इंडिया आघाडीसाठी आनंद वाटावा, अशी कोणतीही बातमी नाही. त्यांना अधिक कष्ट घेण्याची गरज आहे. भ्रष्टाचारा संपविण्याची गरज आहे. तसेच लोकांबद्दल अधिक संवेदनशील राहण्याची गरज आहे. याऐवजी विरोधक अपप्रचार करून निवडणूक जिंकू शकत नाहीत. पंतप्रधान मोदी देशाला पुढे घेऊन गेले आहेत, तसेच देशाला ते आणखी पुढे घेऊन जाणार आहेत. याबद्दल आमच्या मनात दुमत नाही. तसेच देशातील जनतेलाही हे पटलेले आहे.अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान मोदींच्या पंतप्रधान पदावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. "भाजपाचे लोक इंडिया आघाडीला प्रश्न विचारतात की, तुमचा पंतप्रधान कोण असणार?

### अरविंद केजरीवाल काय म्हणाले?

अमित शाह मोदींची गॅरंटी पूर्ण करणार आहेत का?" असा सवाल केजरीवाल यांनी उपस्थित केला.नंतर अरविंद केजरीवाल यांनी आज आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांना जाहीर सभेद्वारे संबोधित केले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपावर जोरदार टीका केली. "पुढील वर्षी १७ सप्टेंबर रोजी मोदी ७५ वर्षांचे होणार असून त्यांना राजकारणातून निवृत्ती घ्यावी लागेल आणि त्यांच्याजागी अमित शाह पंतप्रधान होतील", असा दावा अरविंद केजरीवाल यांनी केला होता. या दाव्यावर आता अमित शाह यांनी थेट उत्तर दिले आहे. तेलंगणाच्या दौऱ्यावर असलेल्या अमित शाह यांनी आज हैदराबाद येथे पत्रकार परिषद घेतली. पत्रकार परिषदेत अरविंद केजरीवाल यांच्या दाव्याबाबत प्रश्न विचारला असता ते म्हणाले, "पंतप्रधान मोदी ७५ वर्षांचे होणार असल्यामुळे केजरीवाल आणि कंपनीला फार आनंदीत होण्याची गरज नाही. ७५ व्या वर्षी निवृत्त व्हावे, हे भाजपाच्या घटनेत कुठेही लिहिलेले नाही. नरेंद्र मोदी आपली टर्म पूर्ण करतील. तसेच पुढेही मोदीच देशाचे नेतृत्व करत राहतील. याबाबत भाजपात कोणताही संभ्रम नाही. विरोधक मात्र संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

पण मी भाजपाला प्रश्न विचारतो की, तुमचा पंतप्रधान कोण असणार? मोदी पुढच्या वर्षी १७ सप्टेंबर रोजी ७५ वर्षांचे होत आहेत. मोदी यांनी स्वतःच २०१४ रोजी नियम लागू केला होता की, जो नेता ७५ वर्षांचा होईल त्याला निवृत्त केले जाईल. त्यांनी सर्वात आधी आडवाणींना, मुरली मनोहर जोशी, यशवंत सिन्हा, सुमित्रा महाजन यांना निवृत्त केले गेले. मग आता मोदींच्या निवृत्तीची वेळ आली आहे. त्यामुळे भाजपानेच सांगावे की, त्यांचा पंतप्रधान कोण असणार?", असा सवाल अरविंद केजरीवाल यांनी विचारला होता. पंतप्रधान मोदी निवृत्त झाल्यानंतर त्यांच्याजागी अमित शाह पंतप्रधान होतील. म्हणूनच ते अमित शाह यांच्यासाठी मत मागत आहेत. जर भाजपाची सत्ता आलीच तर पुढच्या दोन महिन्यात योगी आदित्यनाथ यांना बाजूला केले जाईल. त्यानंतर अमित शाह यांना पंतप्रधान केले जाईल. मी त्यांना प्रश्न विचारू इच्छितो की, मोदींनी दिलेली गॅरंटी कोण पूर्ण करणार?

# पाकव्याप्त काश्मीरमध्ये आंदोलनाचा भडका

## लष्कर रस्त्यावर उतरलं; 70 आंदोलकांवर कारवाईचा बडगा!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**एकीकडे भारतात लोकसभा निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला असताना पाकव्याप्त काश्मीरवर सातत्याने चर्चा होताना दिसत आहे. तर दुसरीकडे प्रत्यक्ष पाकव्याप्त काश्मीरमध्ये आंदोलनाचा भडका उडाल्याचं दिसत आहे. पाकिस्तानकडून या भागात तैनात करण्यात आलेल्या स्थानिक प्रशासनाच्या धोरणांचा विरोध करण्यासाठी स्थानिक जनतेनं शांततापूर्ण आंदोलनाचं नियोजन करण्यात आलं होतं.**

मात्र, त्यानंतर पाकिस्तानी लष्करानं केलेल्या कारवाईनंतर आंदोलकांच्या संतापाचा भडका उडाला आणि आंदोलन चिघळलं. एएनआयनं यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे.पाकव्याप्त काश्मीर अर्थात POK मधील मिरपूर जिल्ह्यातल्या दादयाल भागात हे आंदोलन झालं. शुक्रवारी आंदोलनाला लागलेल्या हिंसक वळणानंतर पाकिस्तानी लष्करानं कारवाई अधिक तीव्र केली आणि मोठ्या प्रमाणावर अटकसत्र राबवण्यात आलं.पाकिस्तान सरकारने नुकताच करवाढ करण्याबाबत निर्णय घेतला. त्याचबरोबर पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढलेली दरवाढ, महागाई यामुळे पाकव्याप्त काश्मीरमधील जनता त्रस्त झाली आहे. या



पार्श्वभूमीवर शनिवारी ११ मे रोजी पीओकेमधील जनतेनं निषेध मोर्चा काढण्याचं नियोजन केलं होतं. मात्र, हा निषेध मोर्चा मोडून काढण्यासाठी पाकिस्तान सरकारनं या भागात मोठ्या प्रमाणावर सैन्यदल पाठवलं. पाकिस्तानी लष्करानं हे आंदोलकांची धरपकड केली. एकूण ७० आंदोलक नेत्यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. तसेच, लष्कराकडून या भागात मार्चही करण्यात आला. दरम्यान, आंदोलकांनी या कारवाईचा विरोध करण्यासाठी सैन्यावर दगडफेकही केल्याचं सांगितलं जात आहे. यानंतर स्थानिक प्रशासनाने या भागात संचारबंदी


### मग तुम्हीच त्याला आवरा

जम्मू-काश्मीर जॉइंट आवामी ॲक्शन कमिटी आणि पाकिस्तान प्रशासन यांच्यात या वर्षी फेब्रुवारीमध्ये एक करार झाला होता. त्यानुसार, पाकिस्तान सरकारनं आंदोलकांच्या मागण्या मान्य करण्याचं आश्वासन दिलं होतं. मात्र, सरकारनं आश्वासन पाळलं नसल्यामुळे त्यावरून आंदोलकांचा संताप अनावर झाला. यातून आंदोलनाला हिंसक वळण लागलं.एकीकडे भारतात लोकसभा निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला असताना पाकव्याप्त काश्मीरवर सातत्याने चर्चा होताना दिसत आहे. तर दुसरीकडे प्रत्यक्ष पाकव्याप्त काश्मीरमध्ये आंदोलनाचा भडका उडाल्याचं दिसत आहे.

लागू केली आहे. या कारवाईमध्ये पाकिस्तानी लष्करानं ७० नेत्यांना ताब्यात घेतलं आहे. हे नेते जम्मू-काश्मीर जॉइंट अवामी ॲक्शन कमिटीशी संलग्न असल्याचं वृत्त स्थानिक माध्यमांनी दिलं आहे. आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्याही फोडल्या. यावेळी काही अश्रुधुराच्या नळकांड्या बाजूच्याच शाळेत पडल्यामुळे तेथील शाळकरी मुली जखमी झाल्याचंही या वृत्तांमध्ये नमूद करण्यात आलं आहे.

# दारा सिंहला शॅम्पेन पिताना पाहून बिग बी चक्रावले होते

कुस्तीपटू आणि अभिनेता दारा सिंग हे रामानंद सागर यांच्या 'रामायण'मधील हनुमानाच्या भूमिकेसाठी प्रचंड लोकप्रिय होते. २०१२ मध्ये वयाच्या 83 व्या वर्षी त्यांचे निधन झाले. दिवंगत अभिनेत्याचा मुलगा विंदू दारा सिंग याने अलीकडेच त्यावेळचा एक किस्सा शेअर केला. आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर विंदू आणि त्याच्या घरच्यांनी शॅम्पेन पिऊन त्यांचे जीवन साजरा केले होते अन् नेमके त्यावेळी त्यांच्या घरी अमिताभ बच्चन आले. हाच किस्सा विंदू यांनी शेअर केला आहे. यूट्यूबर सिद्धार्थ कन्नन संवाद साधताना विंदू दारा सिंह म्हणाला, “माझ्या वडिलांनी सांगितले होते, 'जेव्हा मी हे जग सोडून जाईन, तेव्हा त्या दिवशी मी जेवढ जगलो त्याचं सेलिब्रेशन कर, रडू नकोस.' ज्या दिवशी वडिलांचे निधन झाले तेव्हा रात्री आमचे संपूर्ण कुटुंब तिथे उपस्थित होते, तेंव्हा मला बाबांनी सांगितलेली गोष्ट आठवली, त्यामुळे सर्वांचा निरोप घेतल्यानंतर आम्ही शॅम्पेनची बाटली उघडून पिण्यास सुरुवात केली अन् पार्टी करू लागलो, सगळेच यावेळी वडिलांची आठवण काढत होते.”जेव्हा विंदू आणि त्याचे कुटुंबीय हे सेलिब्रेशन करत होते तेव्हा नेमके अमिताभ बच्चन त्यांच्या घरी आले. त्या घटनेबदल बोलताना विंदू म्हणाला,



“त्यावेळी दरवाजाची बेल वाजली अन् दार उघडले तर खुद्द बच्चन साहेब तिथे होते. त्यादिवशी अमिताभ बच्चन त्यांच्या चित्रीकरणात व्यस्त असल्याने ते रात्री आम्हा कुटुंबियांना भेटायला आले होते. आमच्या हातात शॅम्पेनचे ग्लास पाहून त्यांनी मला विचारले की नेमकं काय सुरू आहे? त्यावेळी मी सांगितलं की बाबांनी सांगितलं होतं की ते जेव्हा या जगातून जातील तेव्हा त्यांचे जीवन साजरे करा, त्यामुळे आम्ही तेच करत आहे.” पुढे विंदू म्हणाला, “त्यांनी त्यावर मला काहीच उत्तर दिलं नाही अन् थेट ते माझ्या आईला भेटायला गेले अन् तिच्याशी बोलू लागले. पण आमच्या हातातले ग्लास आणि एकूणच तिथलं वातावरण पाहून ते चांगलेच आश्चर्यचकित झाले होते हे त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होते.” २०१२ मध्ये जेव्हा दारा सिंह यांचे निधन झाले तेव्हा अमिताभ बच्चन व अभिषेक बच्चन यांनी ट्वीट करत त्यांचे दुःख व्यक्त केले होते.

## मीरा लग्नबंधनात अडकणार !

प्रियांका चोप्राची चुलत बहीण अभिनेत्री मीरा चोप्रा लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. तिची लग्नपत्रिका सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यात लग्नाआधीच्या सर्व सोहळ्यांबद्दल माहिती देण्यात आली आहे. मीरा राजस्थानमधील जयपूरमध्ये लग्नगाठ बांधणार आहे. तिच्या होणाऱ्या पतीचं नाव रक्षित केजरीवाल आहे. मीरा चोप्रा ही सुदेश व नीलम चोप्रा यांची लेक आहे. ती रक्षित केजरीवालशी जयपूरमध्ये १२ मार्च रोजी लग्न करणार आहे. त्यांच्या लग्नाच्या विधींना मेहेंदीपासून सुरुवात होईल. मेहेंदी समारंभ ११ मार्च रोजी संध्याकाळी होईल, संगीत व कॉकटेल ११ मार्चला संध्याकाळी सात वाजता सुरू होईल, त्यांचा हळदी समारंभ १२ मार्चला सकाळी १० वाजता होईल आणि त्याच दिवशी सायंकाळी साडेचार वाजता हे जोडपं लग्नबंधनात अडकेल.

## शिल्पाचं सडेतोड उत्तर



शिल्पा शेट्टी ही बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री आहे. शिल्पाचा पती राज हा प्रसिद्ध उद्योगपती आहे. शिल्पाने राजशी पैशांसाठी लग्न केल्याची टीका अनेकदा तिच्यावर केली जाते, या गोष्टीवरून तिला ट्रोलही केलं जातं. आता शिल्पाने या टीकेला सडेतोड उत्तर दिलं आहे. राज श्रीमंत आहे हे गुगल करताना ते माझ्याबद्दल माहिती काढायला विसरले होते, अशा शब्दांत तिने ट्रोलर्सना सुनावलं आहे. 'झूम' शी बोलताना शिल्पा शेट्टी म्हणाली, “जेव्हा मी राजशी लग्न केले तेव्हा गुगलच्या मते तो १०८ वा सर्वात तरुण किंवा सर्वात श्रीमंत ब्रिटिश भारतीय होता, ही चांगली गोष्ट आहे. मात्र, त्यावेळी गुगलवर शिल्पाबद्दल माहिती काढायले लोक विसरले, जी स्वत:ही श्रीमंत होती. मी आता अजून जास्त श्रीमंत झाले आहे आणि माझे सर्व आयकर, जीएसटी बिलं भरते.”शिल्पा पुढे म्हणाली, “एक यशस्वी महिला तिच्या जोडीदारामध्ये फक्त पैसा शोधत नाही. राज श्रीमंत होता म्हणून मी त्याच्याशी लग्न केलं नाही, कारण पैसा माझ्यासाठी कधीच महत्त्वाचा नव्हता. राजपेक्षाही खूप श्रीमंत लोक होते ज्यांना मी आवडायचे, पण राज माणूस म्हणून कसा आहे हे जाणून घेतल्यानंतर मी लग्न केलं. जर त्याच्याकडे पैसे असते.

## सिद्धार्थ बोडकेचा व्हिडीओ आला समोर

'झी मराठी' वाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' मधील नेत्रा अर्थात अभिनेत्री तितीक्षा तावडे काही दिवसांपूर्वी लग्नबंधनात अडकली. २६ फेब्रुवारीला तिने अभिनेता सिद्धार्थ बोडकेबरोबर लग्नगाठ बांधून आयुष्याच्या नव्या प्रवासाला सुरुवात केली. लग्नाच्या सात दिवसांनी अभिनेत्री कामाला लागली आहे. 'सातव्या मुलीची सातवी मुलगी'च्या सेटवर तितीक्षाचं स्वागत करण्यात आलं. त्यानंतर आता अभिनेत्रीचा नवरा सिद्धार्थ बोडके बॉलीवूडच्या एका प्रसिद्ध अभिनेत्रीबरोबर झळकणार आहे. याचा व्हिडीओ नुकताच समोर आला आहे. अभिनेता सिद्धार्थ बोडकेने याआधी हिंदी मालिका व चित्रपटांमध्ये काम केलं आहे. या मालिका व चित्रपटांमधील त्याच्या भूमिका हिट झाल्या आहेत. आता तो बॉलीवूडच्या एका प्रसिद्ध अभिनेत्रीसह काम करताना दिसणार आहे. याचा व्हिडीओ बॉलीवूडच्या त्या अभिनेत्री सोशल मीडियावर शेअर केला असून व्हायरल झाला आहे. सिद्धार्थ काम करत असलेल्या त्या बॉलीवूडच्या प्रसिद्ध अभिनेत्रीचं नाव आहे उर्वशी रौतेला. उर्वशीसह सिद्धार्थ आगामी चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात शिव तांडव डान्स आहे. या डान्सच्या चित्रीकरणादरम्यानचा व्हिडीओ उर्वशीने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. ज्यामध्ये सिद्धार्थ एका वेगळ्या लूकमध्ये पाहायला मिळत आहे. कपाळाला भस्म, हातात भलामोठा शंख घेऊन अभिनेता दिसत आहे. अभिनेत्रीने शेअर केलेल्या या व्हिडीओला सिद्धार्थने लाइक केलं आहे.

## विवेक ओबेरॉयने मंत्र्याच्या लेकीशी केलं लग्न



बॉलीवूड अभिनेता विवेक ओबेरॉयचा 'कंपनी' हा पहिलाच चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला होता. यानंतर त्याने 'साथिया', 'युवा' अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम केलं. परंतु, या दरम्यान विवेक त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे देखील चर्चेत आला होता. ऐश्वर्या राय आणि त्याचं अफेअर त्यानंतर झालेलं ब्रेकअप या गोष्टी चर्चेचा विषय ठरल्या होत्या. दोघांच्या ब्रेकअपची कलाविश्वात खूप चर्चा झाली होती. या प्रसंगानंतर लग्न न करण्याच्या निर्णयावर विवेक ठाम होता. त्याला अजिबात लग्न करायचं नव्हतं. ऐश्वर्यानंतर त्याने कोणत्याही मुलीशी लग्न केलं नव्हतं. अशातच त्याची ओळख प्रियांका अल्वाशी झाली आणि पुढे थोड्याच दिवसात हे दोघेही लग्नबंधनात अडकले. विवेक ओबेरॉयने नुकतीच 'ह्युमन्स ऑफ बॉम्बे'ला मुलाखत दिली. यावेळी अभिनेत्याने जुन्या आठवणींना उजाळा देत त्याचं लग्न कसं अरेंज मॅरेज पद्धतीत जमलं? याविषयी खुलासा केला. विवेकची आई सतत लग्नाच्या मागे लागली होती. परंतु, ब्रेकअपनंतर अभिनेता लग्न करण्यास अजिबात तयार नव्हता. अशातच विवेकला त्याच्या मावशीने (आईच्या बहिणीने ) प्रियांकाचं स्थळ आणलं. तिचा फोटो पाहून आणि आईच्या हट्टापायी विवेक प्रियांकाची भेट घेण्यास तयार झाला. याशिवाय, खरंच मुलगी आवडली तर आम्ही १ वर्ष एकमेकांना समजून घेण्यासाठी डेट करू त्यानंतर लग्न करू अशी अट विवेकने त्याच्या आईला घातली होती. विवेकने प्रियांकाला भेटण्यासाठी होकार दिला तेव्हा ती इटलीला आपल्या कुटुंबीयांबरोबर सुट्टी एन्जॉय करत होती. त्यामुळे अभिनेता प्रियांकाला भेटायला इटलीला गेला.

# कोलकाता नाईट रायडर प्ले ऑफसमध्ये!

## मुंबईवर दणदणीत विजयासह बाद फेरी गाठणारा पहिलाच संघ

नवी दिल्ली ।। वृत्तसंस्था

**कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर पावसाचा व्यत्यय आल्यामुळे १६-१६ षटकांचा करण्यात आलेल्या सामन्यात केकेआरने मुंबई इंडियन्सवर १८ धावांनी विजय मिळवला. त्याचबरोबर आयपीएल २०२४ मधील हंगामात बाद फेरी गाठणारा पहिलाच संघ ठरला आहे आहे. या अगोदर दोन वर्ष प्राथमिक फेरीत गाशा गुंडाळलेल्या या संघाने यंदाच्या हंगामात गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली शानदार पुनरागमन केले. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना कोलकाता संघाने ७ गडी गमावून मुंबईसमोर १५८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मात्र, प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्सचा संघ १३९ धावांच करु शकला.**



कोलकातान नाईट रायडर्सने दिलेल्या १५८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सने पॉवरप्लेच्या षटकात एकही विकेट न गमावता ६२ धावा केल्या होत्या. यानंतर प्रथम किशन ७ व्या षटकात बाद झाला आणि नंतर ८ व्या षटकात रोहित देखील बाद झाला. इथून सामना कोलकाताच्या बाजूने झुकू लागला. पॉवरप्लेनंतर मुंबईला पुढील ४ षटकांत केवळ १९ धावा करता आल्या आणि २ महत्त्वाच्या विकेट्सही गमावल्या, त्यामुळे संघाची धावसंख्या १० षटकांत २ बाद ८१ अशी झाली. शेवटच्या ६ षटकात संघाला ७७ धावांची गरज होती, पण सूर्यकुमार यादवने ११व्या षटकात ११ धावांवर आपली विकेट गमावली. पुढील २ षटकांत हार्दिक पंड्या आणि टीम डेव्हिड बाद झाल्याने मुंबई संघाच्या अडचणीत खूप वाढ झाली.त्यानंतर मुंबईला विजयासाठी शेवटच्या ३ षटकात ५७ धावा करायच्या होत्या. नमन धीर आणि तिलक वर्मा अजूनही क्रीजवर होते. १५ व्या षटकात आंद्रे रसेलने १९ धावा दिल्याने सामना रोमांचक झाला. मुंबईला शेवटच्या ६ चेंडूत २२ धावा करायच्या होत्या. नमन धीर शेवटच्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर ६ चेंडूत १७ धावा काढून बाद झाला. यानंतर हर्षित राणाने ३२ धावांवर तिलक वर्माला पॅव्हेलियनमध्ये पाठवल्याने मुंबईच्या अडचणीत आणखी वाढ झाली. अखेर मुंबईने ८ गडी गमावून १३९ धावा केल्या. केकेआरने १८ धावांनी वि जय मिळवत प्लेऑफसाठी पात्रता मिळवणारा पहिला संघ ठरला. हर्षित राणासह आंद्रे रसेल आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तत्पूर्वी, पावसामुळे सामना दोन तास १५ मिनिटे उशिराने सुरू झाला. पावसाने सामन्यात व्यत्यय आणल्याने सामना १६-१६ षटकांचा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि कर्णधाराचा निर्णय योग्य असल्याचे सिद्ध करण्यात गोलंदाजांनी वेळ वाया घालवला नाही. केकेआरला सुरुवातीच्या धक्क्यातून सावरता आले नाही आणि संघाने १६ षटकांत ७ गडी गमावून १५७ धावा केल्या. केकेआरसाठी व्यंकटेश अय्यरने २१ चेंडूंत ६ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने सर्वाधिक ४२ धावा केल्या. मुंबईसाठी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि अनुभवी फिरकी गोलंदाज अमित मिश्राने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर पावसाचा व्यत्यय आल्यामुळे १६-१६ षटकांचा करण्यात आलेल्या सामन्यात केकेआरने मुंबई इंडियन्सवर १८ धावांनी विजय मिळवला. त्याचबरोबर आयपीएल २०२४ मधील हंगामात बाद फेरी गाठणारा पहिलाच संघ ठरला आहे आहे. या अगोदर दोन वर्ष प्राथमिक फेरीत गाशा गुंडाळलेल्या या संघाने यंदाच्या हंगामात गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली शानदार पुनरागमन केले.

### किशन 7 व्या षटकात बाद

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना कोलकाता संघाने ७ गडी गमावून मुंबईसमोर १५८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मात्र, प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्सचा संघ १३९ धावांच करु शकला.कोलकातान नाईट रायडर्सने दिलेल्या १५८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सने पॉवरप्लेच्या षटकात एकही विकेट न गमावता ६२ धावा केल्या होत्या. यानंतर प्रथम किशन ७ व्या षटकात बाद झाला आणि नंतर ८ व्या षटकात रोहित देखील बाद झाला. इथून सामना कोलकाताच्या बाजूने झुकू लागला. पॉवरप्लेनंतर मुंबईला पुढील ४ षटकांत केवळ १९ धावा करता आल्या आणि २ महत्त्वाच्या विकेट्सही गमावल्या, त्यामुळे संघाची धावसंख्या १० षटकांत २ बाद ८१ अशी झाली.

# प्लेऑफच्या रोमांचक शर्यतीत गुजरात संघात मोठा बदल

## 23 वर्षीय भारतीय वेगवान गोलंदाजाची गुजरात संघात एन्ट्री

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल २०२४ मध्ये चाहत्यांना दररोज रोमांचक सामने पाहायला मिळत आहेत. आता आयपीएल २०२४ चा हंगाम अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत आहे. प्लेऑफमध्ये जाण्यासाठी सर्वच संघ जोरदार प्रयत्न करत आहेत. चालू हंगामात गुजरात टायटन्सचे अजून दोन सामने बाकी आहेत. मात्र याआधी गुजरात टायटन्स संघाने एक मोठा निर्णय घेतला आहे. एका २३ वर्षीय भारतीय वेगवान गोलंदाजाने संघात प्रवेश केला आहे.**





दुखापतग्रस्त डावखुरा वेगवान गोलंदाज सुशांत मिश्राच्या जागी गुजरात टायटन्सने उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रारचा संघात समावेश केला आहे. गुरनूर देशांतर्गत स्पर्धांमध्ये पंजाबकडून खेळतो. आयपीएलमधील त्याचा हा दुसरा हंगाम असेल. तो याआधी पंजाब किंग्जकडून खेळला आहे. या २३ वर्षीय खेळाडूला एका आयपीएल सामन्याचा अनुभव आहे. गुजरातने आयपीएल २०२४ साठी गुरनूर ब्रारला ५० लाख रुपयांच्या मूळ किमतीत विकत घेतले आहे.गेल्या मोसमात तो लखनऊ सुपरजायंट्सविरुद्ध पंजाब किंग्जकडून सामना खेळला होता. त्या सामन्यात त्याने एकही विकेट न घेता ३ षटकात ४२ धावा दिल्या. गुरनूरने २०२१ मध्ये पंजाबसाठी एक लिस्ट ए सामनाही खेळला आहे. गोव्याविरुद्धच्या या सामन्यात त्याने ६२ धावांत एक विकेट घेतली होती. प्रथम श्रेणीमध्ये त्याने ८ सामन्यांत ४५.५७ च्या सरासरीने सात विकेट्स घेतल्या आहेत.चेन्नई सुपर किंग्जविरुद्धचा शेवटचा सामना जिंकून गुजरात टायटन्स संघ गुणतालिकेत आव्या स्थानावर पोहोचला आहे. गुजरातने आतापर्यंत १२ सामन्यांपैका ५ जिंकले असून ७ गमावले आहेत. त्यामुळे संघाचे १० गुण आहेत. गुजरात अजूनही प्लेऑफच्या शर्यतीत आहे. मात्र, गुजरात उर्वरित दोन्ही सामने मोठ्या फरकाने जिंकावे लागतील. तसेच, इतर संघांच्या निकालावर अवलंबून राहावे लागेल. गुजरातचे पुढील दोन सामने कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्याशी होणार आहेत.

### गुजरात टायटन्सचा संघ

शुबमन गिल (कर्णधार), साई सुदर्शन, शाहरुख खान, डेव्हिड मिलर, मॅथ्यू वेड (यष्टीरक्षक), राहुल तेवतिया, राशिद खान, नूर अहमद, उमेश यादव, मोहित शर्मा, कार्तिक त्यागी, अभिनव मनोहर, संदीप वॉरियर, शरथ बीआर, दर्शन नळकांडे, जयंत यादव, ऋद्धिमान साहा, जोशुआ लिटल, विजय शंकर, मानव सुथार, केन विल्यमसन, साई किशोर, स्पेन्सर जॉन्सन, अजमतुल्ला ओमरझाई, गुरनूर ब्रार.आयपीएल २०२४ मध्ये चाहत्यांना दररोज रोमांचक सामने पाहायला मिळत आहेत. आता आयपीएल २०२४ चा हंगाम अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत आहे. प्लेऑफमध्ये जाण्यासाठी सर्वच संघ जोरदार प्रयत्न करत आहेत. चालू हंगामात गुजरात टायटन्सचे अजून दोन सामने बाकी आहेत. मात्र याआधी गुजरात टायटन्स संघाने एक मोठा निर्णय घेतला आहे.